राज्य सेवा (पूर्व) परीक्षा - २०१२

प. दि. १० जून, २०१२

A

2012

Code : **PRM**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
**BOOKLET No.** 350973

# प्रश्नपुस्तिका

## सामान्य क्षमता चाचणी

वेळ : 2 (दोन) तास

एकूण प्रश्न : 200

एकूण गुण : 200

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 200 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे, त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी पडताळून पहावा.**

www.upsclever.com

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.upscfever.com

1. संयुक्त महाराष्ट्र चळवळीला पाठिंबा म्हणून कोणी केंद्र सरकारच्या अर्थमंत्री पदाचा राजीनामा दिला ?
   (1) यशवंतराव चव्हाण (2) बाळासाहेब खेर
   (3) सी. डी. देशमुख (4) के. एम.पन्निकर
   Who resigned from the post of Finance Minister of India to support the Sanyukta Maharashtra Movement ?
   (1) Yeshwantrao Chavan (2) Balasaheb Kher
   (3) C. D. Deshmukh (4) K. M. Pannikar

2. 1962 साली जेंव्हा चीनने भारतावर आक्रमण केले तेंव्हा भारताचे संरक्षण मंत्री कोण होते ?
   (1) जवाहरलाल नेहरु (2) पी. सीतारामय्या
   (3) कृष्णा मेनन (4) अरुण मेहता
   Who was the Defence Minister of India when China attacked India in 1962 ?
   (1) Jawaharlal Nehru (2) P. Sitaramayya
   (3) Krishna Menon (4) Arun Mehta

3. कोणती जोडी चुकीची आहे ?
   (1) सावित्रीबाई फुले – सुबोध रत्नाकर
   (2) पंडिता रमाबाई – दि हाय कास्ट हिंदू वूमन
   (3) विठ्ठल रामजी शिंदे – आठवणी व अनुभव
   (4) शाहू महाराज – हिंदू कोड बिल
   Which is the mismatched pair ?
   www.upscfever.com
   (1) Savitribai Phule – Subodh Ratnakar
   (2) Pandita Ramabai – The High Caste Hindu Woman
   (3) Vitthal Ramji Shinde – आठवणी व अनुभव Remembrances and Experiences
   (4) Shahu Maharaj – Hindu Code Bill

4. ''वेद हे अपौरुषेय नसून आर्यांनी त्यांची निर्मिती केली आहे'', असा विचार मांडणारे विचारवंत कोण ?
   (1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (2) विठ्ठल रामजी शिंदे
   (3) महात्मा जोतीबा फुले (4) शाहू महाराज
   Who put forth the thought that "Vedas were not infalliable and that they were created by Aryans" ?
   (1) Dr. Babasaheb Ambedkar (2) Vitthal Ramji Shinde
   (3) Mahatma Jotiba Phule (4) Shahu Maharaj

5. स्त्री मुक्ती संदर्भात खालीलपैकी कोणी कार्य केले नाही ?
   (1) म. गो. रानडे (2) गो. ग. आगरकर
   (3) धों. के. कर्वे (4) वरीलपैकी एकही पर्याय बरोबर नाही
   Who did not work for emancipation of women ?
   (1) M. G. Ranade (2) G. G. Agarkar
   (3) D. K. Karve (4) None of the above alternatives is correct

6. 'पंचशील' वर सर्व प्रथम सही करणारे दोन देश कोणते ?

| | |
|---|---|
| (1) भारत व फ्रान्स | (2) भारत व इंग्लंड |
| (3) भारत व जपान | (4) भारत व चीन |

Which two countries were the first to sign the Panchsheel ?

| | |
|---|---|
| (1) India and France | (2) India and England |
| (3) India and Japan | (4) India and China |

---

7. 1857 च्या उठावास 'स्वातंत्र्ययुद्ध' असे कोणी संबोधिले ?

| | |
|---|---|
| (1) प्रा. न. र. फाटक | (2) पी. ई. रॉबर्ट्स |
| (3) डॉ. आर. सी. मुजूमदार | (4) वि. दा. सावरकर |

Who called the "1857 Uprising" "A War of Independence" ?

| | |
|---|---|
| (1) Prof. N. R. Phathak | (2) P. E. Roberts |
| (3) Dr. R. C. Mujumdar | (4) V. D. Sawarkar |

---

8. कोणत्या कायद्याने मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची निर्मिती केली ?

| | |
|---|---|
| (1) 1813 च्या सनदी कायद्याने | (2) 1909 च्या मोर्ले-मिन्टो सुधारणा |
| (3) 1919 च्या मॉन्टेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा | (4) 1935 च्या भारत सुधारणा कायद्याने |

Which act declared separate electorates for Muslims ?

| | |
|---|---|
| (1) Charter Act of 1813 | (2) Morley-Minto Reforms 1909 |
| (3) Montague-Chemsford Reforms 1919 | (4) Government of India Act, 1935 |

---

9. जागतिक शांतता व आंतरराष्ट्रीय सहकार्य यासाठी भारताने कोणत्या तत्त्वांचा पुरस्कार केला ?

www.upscfever.com

| | |
|---|---|
| (1) सर्व धर्म समभाव | (2) अलिप्ततावाद |
| (3) पंचशील | (4) निशस्त्रीकरण |

Which principles did India promote for International Peace and Co-operation ?

| | |
|---|---|
| (1) Equality of Religion | (2) Non-alliance |
| (3) Panchasheel | (4) Disarmament |

---

10. महादेव गोविंद रानडे यांच्या संदर्भात पुढील विधाने पहा :

अ) त्यांच्यावर संत तुकारामांचा प्रभाव होता.
ब) त्यांनी बऱ्याच संस्था स्थापन केल्या.
क) ते मवाळ प्रवाहाचे होते.
ड) त्यांनी प्रौढ शिक्षण व पुनर्विवाहाचा पुरस्कार केला.

| | |
|---|---|
| (1) ब व क बरोबर | (2) अ, ब, क बरोबर |
| (3) ब, क, ड बरोबर | (4) सर्व बरोबर |

Consider the following statements regarding Mahadev Govind Ranade

A) He was influenced by Sant Tukaram
B) He established many institutions
C) He was a moderate
D) He promoted adult education and remarriage

| | |
|---|---|
| (1) B and C are right | (2) A, B, C are right |
| (3) B, C, D are right | (4) All are right |

**11.** "बहिष्कार हे अस्त्र पराकाष्ठेचा उपाय म्हणून राखून ठेवावे" असे कोणाचे मत होते ?

(1) महादेव गोविंद रानडे (2) गोपाळ कृष्ण गोखले

(3) फिरोझशहा मेहता (4) दादाभाई नौरोजी

Who believed that "a weapon like boycott must be reserved for extreme occasions" ?

(1) Mahadev Govind Ranade (2) Gopal Krishna Gokhale

(3) Pherozshah Mehta (4) Dadabhai Naoroji

---

**12.** खालीलपैकी कोणती जोडी चुकीची आहे ?

(1) रयत शिक्षण संस्था – कर्मवीर भाऊराव पाटील

(2) जागरूक – वालचंद कोठारी

(3) दिन मित्र – मुकुंदराव पाटील

(4) मराठा लीग – सयाजीराव गायकवाड

Which of the following is wrongly matched ?

(1) Rayat Shikshan Sanstha – Karmavir Bhaurao Patil

(2) Jagruk – Walchand Kothari

(3) Dinmitra – Mukundrao Patil

(4) Maratha League – Sayajirao Gaikwad

www.upscfever.com

---

**13.** हिमालयातील नद्यांच्या संदर्भात खाली दिलेल्या विधानांचा विचार करा.

अ) त्यांची झीज करण्याची क्षमता प्रचंड आहे.

ब) त्या नद्या बारमाही आहेत.

क) या नद्यांनी मोठ्या प्रमाणात 'घळ्यांची' निर्मिती केलेली नाही.

ड) बहुतेक नद्यांचा उगम हिमालयाच्या वरच्या भागात आहे.

वरीलपैकी कोणते विधान/विधाने चुकीची आहेत ?

(1) फक्त अ, ब (2) फक्त क (3) अ, ब, क, ड (4) अ, ब, ड

Consider the following statements in respect of Himalayan rivers :

a) They have a great eroding capacity

b) These are perennial rivers

c) These rivers have not formed 'gorges'

d) Most of these rivers have their origin in upper Himalayas

Which of the statements given above is / are not correct ?

(1) Only a, b (2) Only c (3) a, b, c, d (4) a, b, d

14. योग्या जोड्या लावा :

| | स्तंभ I (वनांचे प्रकार) | | स्तंभ II (वृक्ष) |
|---|---|---|---|
| A) | सदाहरित | I) | बाबुळ |
| B) | पानझडी | II) | रबर |
| C) | काटेरी | III) | खारफुटी |
| D) | समुद्रकाठची | IV) | साग |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| (1) | I | IV | III | II |
| (2) | II | III | I | IV |
| (3) | II | IV | I | III |
| (4) | I | II | III | IV |

Match the following :

| | Column I (Type of forest) | | Column II (Trees) |
|---|---|---|---|
| A) | Evergreen | I) | Babul |
| B) | Deciduous | II) | Rubber |
| C) | Thorny | III) | Mangroves |
| D) | Coastal | IV) | Teak |

www.upscfever.com

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| (1) | I | IV | III | II |
| (2) | II | III | I | IV |
| (3) | II | IV | I | III |
| (4) | I | II | III | IV |

15. हिंदी महासागरात विषुववृत्ताजवळ स्थित असलेल्या कमी दाबाच्या विस्तीर्ण पट्ट्यास काय नाव आहे ?

(1) आंतर-उष्णकंटीबंधीय केंद्रीभवन पट्टा (2) पश्चिमी जेटस्ट्रीम

(3) विषुववृत्तीय कमी दाब पट्टा (4) यापैकी नाही

What is the name of low pressure belt located near the equator in the Indian ocean ?

(1) Intra-tropical centralized zone (2) Western jet stream

(3) Tropical low pressure belt (4) None of these

16. योग्य जोड्या लावा :

| | स्तंभ I<br>धरण | | स्तंभ II<br>जलाशयाचे नाव |
|---|---|---|---|
| A) | कोयना | I) | शहाजी सागर |
| B) | भाटघर | II) | शिवसागर |
| C) | माणिकडोह | III) | ऑर्थर सरोवर |
| D) | भंडारदरा | IV) | येसाजीकंक |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| (1) | I | IV | II | III |
| (2) | I | II | III | IV |
| (3) | IV | III | II | I |
| (4) | II | IV | I | III |

Match the following :

| | Column I<br>Dam | | Column II<br>Lake |
|---|---|---|---|
| A) | Koyna | I) | Shahaji Sagar |
| B) | Bhatghar | II) | Shivsagar |
| C) | Manikdoh | III) | Aurther Sarovar |
| D) | Bhandardara | IV) | Yesajikank |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| (1) | I | IV | II | III |
| (2) | I | II | III | IV |
| (3) | IV | III | II | I |
| (4) | II | IV | I | III |

www.upscfever.com

17. वाळू मिश्रित 'लोम' प्रकाराची मृदा कोणत्या पिकासाठी उपयुक्त असते ?
(1) ज्वारी (2) नाचणी (3) तांदूळ (4) चहा

The Sandy 'Loam' soil is favourable for the growth of which crop ?
(1) Jawar (2) Nachani (3) Rice (4) Tea

18. भारतातील एकूण वनक्षेत्रापैकी सर्वात जास्त क्षेत्र कोणत्या वनांनी व्यापलेले आहे ?
(1) विषुववृत्तीय आर्द्र पानझडी वने
(2) विषुववृत्तीय कोरडी हरित वने
(3) विषुववृत्तीय कोरडी पानझडी वने
(4) विषुववृत्तीय अर्ध-हरित वने

Which type of forests are the most extensive in India ?
(1) Tropical moist deciduous forests
(2) Tropical dry evergreen forests
(3) Tropical dry deciduous forests
(4) Tropical semi-evergreen forests

19. महाराष्ट्रात जिल्हा परिषदेची स्थायी समिती सर्वाधिक महत्त्वाची ठरते कारण ________
(1) समिती अधिनियमानुसार गठित झालेली असते.
(2) समितीत जिल्हा परिषदेच्या प्रभावशाली सदस्यांचा समावेश असतो.
(3) जिल्हा परिषदेचा अध्यक्ष समितीचा पदसिद्ध सभापती असतो आणि इतर समित्यांचे सभापती हे पदसिद्ध सदस्य असतात.
(4) जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी हा समितीचा सचिव असतो.
Why in Maharashtra the Standing Committee of Zilla Parishad considered most powerful ?
(1) Committee is constituted as per law.
(2) Committee consists of influencial members of Zilla Parishad
(3) President of Zilla Parishad is ex-officio Chairman and Chairmen of other Committees are ex-officio members.
(4) Chief Executive Officer of Zilla Parishad is the Secretary of the Committee.

---

20. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी कायदा ________
(1) प्रत्येक आर्थिक वर्षात ग्रामीण भागातील अकुशल प्रौढ व्यक्तींना किमान 100 दिवस काम उपलब्ध करून देण्याची हमी देतो.
(2) ग्रामीण भागातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीला रोजगार उपलब्ध करून देतो.
(3) शहरी भागातील अकुशल कामगारांना किमान वेतनाची हमी देतो.
(4) वरील सर्व.
Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act ________
(1) Provides at least 100 days of guaranteed wage employment in a financial year to unskilled adult in rural area.
(2) Provides employment to each and every adult who lives in rural area.
www.upscfever.com
(3) Provides minimum wages to unskilled labour in urban area.
(4) All the above.

---

21. महाराष्ट्रात जमीनीचा रेकॉर्ड, जमीन महसूल व जमीन सुधारणा यासंबंधीची मूलभूत माहिती उपलब्ध करून देणारा शासकीय कर्मचारी कोण ?
(1) तहसीलदार (2) ग्रामसेवक (3) तलाठी (4) पोलीस पाटील
Who provides the basic information about land records, land revenue and land reforms in Maharashtra ?
(1) Tahsildar (2) Gramsevak (3) Talathi (4) Police Patil

---

22. पुढील विधाने विचारात घ्या :
1) म. लोक सेवा आयोगाची स्थापना 1-5-1960 ला झाली.
2) मुंबई लो.से.आ. पूर्वी मुंबई व गुजरात राज्यांसाठी होते.
3) आयोगाचे मूळ मुंबई व सिंध साठीच्या आयोगात आहे.
कोणते/कोणती विधान/विधाने बरोबर आहे/आहेत ?
(1) केवळ 1 (2) 1 व 2 (3) 1 व 3 (4) 1, 2 व 3
Consider the following statements :
1) The MPSC was set up on 1-5-1960.
2) The Bombay PSC earlier covered Bombay and Gujrat States.
3) The Commission traces it origin to the PSC for the provinces of Bombay and Sind.
Which of the above statements are correct ?
(1) Only 1 (2) 1 and 2 (3) 1 and 3 (4) 1, 2 and 3

A

**23.** भारतीय प्रशासनामध्ये सनदी सेवकांच्या भरतीसाठी खुल्यास्पर्धेचे तत्त्व सर्वप्रथम कोणत्या कायद्यानुसार स्वीकारले गेले ?

(1) रेग्यूलेटींग ॲक्ट 1773 (2) चार्टर ॲक्ट 1833
(3) चार्टर ॲक्ट 1853 (4) इंडीयन कौन्सील ॲक्ट 1861

By which Act free and fair competition for recruitment to Indian Administration has been first accepted ?

(1) Regulating Act 1773 (2) Charter Act 1833
(3) Charter Act 1853 (4) Indian Council Act 1861

---

**24.** भारतीय राज्यघटनेतील व्यक्तीच्या मूलभूत कर्तव्याची तरतूद कोणत्या देशाच्या राज्यघटनेवरून घेण्यात आली आहे ?

(1) फ्रान्स (2) यु.एस्.ए. (3) यु. एस्. एस्. आर. (4) यु.के.

The provision of Fundamental Duties in Indian Constitution has been adopted from that of which country ?

(1) France (2) USA (3) USSR (4) UK

---

**25.** भारत सरकार अधिनियम, 1935 मधील 'सूचनापत्राचा' समावेश 1950 च्या भारतीय संविधानात कसा केला आहे ?

(1) मूलभूत हक्क (2) राज्यनीतीची मार्गदर्शक तत्त्वे
(3) मूलभूत कर्तव्ये (4) केंद्र सूची

How has the "Instrument of instructions" contained in the Government of India Act, 1935 been incorporated in the Constitution of India ?

(1) Fundamental Rights (2) Directive Principles of State Policy
(3) Fundamental Duties (4) Union List

---

**26.** खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

www.upscfever.com

a) गुजरातमध्ये स्थानिक संस्थांमध्ये मतदान सक्तीचे केले आहे.
b) गुजरात हे देशातील दुसरे राज्य आहे ज्यात स्थानिक निवडणुकांत मतदान सक्तीचे केले आहे.

(1) फक्त a (2) फक्त b (3) a आणि b (4) a व b दोन्ही नाहीत

Which of the following statements are correct ?

a) Gujarat has made voting in local bodies compulsory.
b) Gujarat is the second state in the country to make voting compulsory in local elections.

(1) a only (2) b only (3) a and b (4) Neither a nor b

---

**27.** खालील समित्या त्यांच्या गठीत क्रमानुसार लावा.

a) जी. व्हि. के. राव समिती
b) बलवंतराय मेहता समिती
c) अशोक मेहता समिती
d) के. संथनम समिती

(1) b – c – d – a (2) b – a – d – c (3) b – a – c – d (4) b – d – c – a

Arrange the following committees in chronological order in which they were constituted.

a) G. V. K. Rao Committee
b) Balwantrai Mehta Committee
c) Ashok Mehta Committee
d) K. Santhanam Committee

(1) b – c – d – a (2) b – a – d – c (3) b – a – c – d (4) b – d – c – a

---

**28.** खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

a) कलम 243-O पंचायतींच्या निर्वाचन बाबीत न्यायालयाच्या हस्तक्षेपास रोख लावते

b) कोणत्याही पंचायतीच्या निवडणुकीच्या वैधतेला आव्हान केवळ राज्याच्या विधिमंडळाच्या तरतूदीनुसार निवडणूक याचिके द्वारा केले जाऊ शकते

(1) फक्त a (2) फक्त b (3) a व b (4) a व b दोन्ही नाही

Which of the following statements are correct ?

a) Article 243-O bars the interference by courts in electoral matters of Panchayats

b) The validity of an election to any Panchayat can be challenged only through an election petition as provided by the legislature of the state

(1) a only (2) b only (3) a and b (4) neither a nor b

---

**29.** संसदेचा सदस्य जर संसदेच्या दुसऱ्या सदनात बसलेला आढळला तर त्याला/तिला किती दंड भरावा लागतो ?

(1) ₹ 1000 (2) ₹ 2500 (3) ₹ 5000 (4) असा कोणताही दंड नाही

If a member of Parliament is found sitting in the other house of the Parliament, how much maximum fine he/she may have to pay ?

(1) ₹ 1000 (2) ₹ 2500 (3) ₹ 5000 (4) There is no such fine

---

**30.** खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

a) पंचायतीमध्ये, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी आरक्षित जागा आहेत परंतु महिलांसाठी नाहीत

b) विसर्जित झाल्यावर निवडून आलेल्या पंचायतीला पूर्ण कार्यकाल उपभोगता येत नाही फक्त उर्वरित कालच उपभोगता येतो.

www.upscfever.com

(1) फक्त a (2) फक्त b (3) a आणि b (4) a व b दोन्ही नाही

Which of the following statements are correct ?

a) For Panchayats, seats are reserved for the scheduled castes and scheduled tribes but not for women.

b) A Panchayat elected after dissolution does not enjoy the full period but remains in office for the remaining period only.

(1) a only (2) b only (3) a and b (4) neither a nor b

---

**31.** इसवी सनाच्या कुठल्या शतकात आयझॅक न्यूटनने त्याचे गतीविषयक तीन नियम मांडलेत ?

(1) 16 वे शतक (2) 17 वे शतक (3) 18 वे शतक (4) 19 वे शतक

In which century (A.D.) did Issac Newton put forth his three laws of motion ?

(1) $16^{th}$ century (2) $17^{th}$ century (3) $18^{th}$ century (4) $19^{th}$ century

---

**32.** प्रकाशाचे अस्तित्व ज्या सूक्ष्म कणांमुळे तयार होते त्या कणांना काय म्हणतात ?

(1) इलेक्ट्रॉन (2) पॉझीट्रॉन (3) फोटॉन (4) प्रोटॉन

Light exists as tiny particles which are called

(1) electrons (2) positrons (3) photons (4) protons

---

**33.** 1945 मध्ये जपानमधील हिरोशिमा आणि नागासाकी ह्यावर टाकलेल्या अणुबाँबमध्ये कोणते अणु इंधन (nuclear fuel) वापरले होते ?

(1) फक्त युरेनियम (2) फक्त प्लूटोनियम
(3) फक्त रेडियम (4) युरेनियम आणि प्लूटोनियम

Which nuclear fuel was used in the two atom bombs dropped in Japan at Hiroshima and Nagasaki in 1945 ?

(1) only uranium (2) only plutonium
(3) only radium (4) uranium and plutonium

---

**34.** आपल्या पृथ्वीच्या सभोवती असलेल्या ओझोन (ozone) आवरणाचा अवक्षय (depletion) झाल्याने, खालीलपैकी कोणत्या विकिरणाची प्रकाशन वृद्धि (exposure) वाढते ?

(1) अल्ट्रा व्हायोलेट रेडीएशन (2) इन्फारेड रेडीएशन
(3) दृश्य विकिरण (4) मायक्रोवेव्ह रेडीएशन

The depletion of the ozone layer surrounding our earth increases our exposure to

(1) UV radiation (2) IR radiation
(3) Visible radiation (4) Microwave radiation

---

**35.** फ्रेन्च शास्त्रज्ञ मेरी क्युरी (Curie) ह्यांनी खालीलपैकी कोणत्या किरणोत्सर्गी पदार्थाचा शोध लावला ?

(1) युरेनियम (2) रेडियम (3) थोरीयम (4) प्लूटोनियम

Which radioactive substance was discovered by the French Scientist Marie Curie ?

(1) Uranium (2) Radium (3) Thorium (4) Plutonium

www.upscfever.com

---

**36.** आधुनिक वैद्यकीय प्रतिमा तंत्रातील (Medical Imaging) सीटी स्कॅन (CT Scan) पद्धतीत खालीलपैकी कोणते विकिरण वापरले जाते ?

(1) अल्फा विकिरण (2) ध्वनि तरंग (3) X (क्ष) विकिरण (4) माईक्रोवेव विकिरण

The method of CT scan used in modern medical imaging uses

(1) Alpha rays (2) Sound waves (3) X-rays (4) Microwaves

---

**37.** पृथ्वीभोवती फिरणाऱ्या उपग्रहाच्या बाबतीत पुढीलपैकी कोणते विधान सत्य नाही ?

1) तो मुक्तपतन होणारा पदार्थ आहे
2) त्याला त्वरण नसते
3) तो स्थिर गतीने फिरतो
4) त्यावर कार्य करणाऱ्या बलाने झालेले कार्य शून्य असते

(1) फक्त 1 (2) 1 व 3 (3) 2 व 3 (4) 2 व 4

For a satellite going around the earth, which of the following statements is not correct ?

1) It is a freely falling body
2) It has no acceleration
3) It is moving with a constant speed
4) Work done by the force acting on it is zero

(1) only 1 (2) 1 and 3 (3) 2 and 3 (4) 2 and 4

**38.** नुकतेच प्रक्षेपित झालेल्या अग्नी–V ह्या क्षेपणास्त्रचा विकास भारतातील कोणत्या विज्ञान संस्थेने केला ?
(1) इस्रो (2) डीआरडीओ (3) सीएसआयआर (4) बीएआरसी
Which Indian scientific organisation developed the ICBM missile, Agni – V, recently launched by India ?
(1) ISRO (2) DRDO (3) CSIR (4) BARC

---

**39.** कोणत्या शास्त्रज्ञाच्या सिद्धांताने रूढ (classical) भौतिकीतून आधुनिक भौतिकीत संक्रमण (transition) झाले ?
(1) आयझॅक न्यूटन (2) सी. व्ही. रामन
(3) एच. जे. भाभा (4) मॅक्स प्लँक (Planck)
Whose theory brought in a transition from classical physics to modern physics ?
(1) Issac Newton (2) C. V. Raman
(3) H. J. Bhabha (4) Max Planck

---

**40.** खालीलपैकी कोणत्या शास्त्रज्ञाने हा सिद्धांत मांडला की सूर्य हा आपल्या सूर्यमालिकेच्या केन्द्रस्थानी आहे ?
(1) कोपरनिकस (2) न्यूटन (3) गॅलिलिओ (4) रुदरफोर्ड
Which scientist proposed the theory that the sun is at the centre of our solar system ?
(1) Copernicus (2) Newton (3) Galileo (4) Rutherford

---

**41.** भारतातील पहिले अणुऊर्जा संयंत्र 1963 मध्ये उभारले गेले. 1963 ते 2011 ह्या काळात भारतात उभारण्यात आलेल्या एकूण अणुऊर्जा संयंत्रांची (nuclear power plants) संख्या सुमारे किती आहे ?
(1) दहा (2) वीस (3) तीस (4) चाळीस
www.upscfever.com
In India the first nuclear power plant was built in 1963. The total number of nuclear power plants built in India during 1963 – 2011 are about
(1) Ten (2) Twenty (3) Thirty (4) Forty

---

**42.** जगात निर्माण होणाऱ्या विद्युत ऊर्जेपैकी किती टक्के विद्युत ऊर्जा अणु ऊर्जा संयंत्रातून (nuclear power plants) निर्माण होते ? (सुमारे टक्केवारी द्या)
(1) सुमारे 50% (2) सुमारे 25% (3) सुमारे 13% (4) सुमारे 3%
What percentage of World's electricity is produced by nuclear power plants ? (give approximate percentage)
(1) about 50% (2) about 25% (3) about 13% (4) about 3%

---

**43.** भारतात जन्मलेल्या कोणत्या भौतिक शास्त्रज्ञाला त्याच्या "ताऱ्यांची रचना आणि विकास क्रम" ह्या विषयावरील संशोधना करता नोबेल पारितोषिक देण्यात आले ?
(1) सी. व्ही. रामन (2) अमर्त्य सेन
(3) मेघनाद सहा (4) एस. चंद्रशेखर
To which India-born physicist a Nobel Prize was awarded for his research related to the structure and evolution of stars ?
(1) C. V. Raman (2) Amartya Sen
(3) Meghnad Saha (4) S. Chandrashekar

---

44. ज्या तंत्रज्ञानातील तज्ञ व्यक्तीने 1984 नंतर भारतातील टेलिफोनच्या दळणवळणात क्रांति घडवून आणली त्यांचे नांव काय ?

(1) विक्रम साराभाई (2) सॅम पित्रोदा
(3) राजा रामण्णा (4) माधवन नायर

What is the name of the technical person who brought revolution in India's telecommunication system after 1984 ?

(1) Vikram Sarabhai (2) Sam Pitroda
(3) Raja Ramanna (4) Madhavan Nair

45. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ रीमोट सेन्सींग (Indian Institute of Remote Sensing) ही संस्था कोणत्या व्यापक संस्थेचा भाग आहे ?

(1) ISRO (2) GSI (3) DAE (4) CSIR

What is the Indian Institute of Remote Sensing part of ?

(1) ISRO (2) GSI (3) DAE (4) CSIR

46. भारताच्या इस्रो (ISRO) संस्थेने प्रक्षेपित केलेल्या इनसॅट (INSAT) ह्या भूस्थिर उपग्रहामुळे खालीलपैकी कोणती सुधारणा झाली आहे ?

(1) भूगर्भ पाहणी (2) हायवे यंत्रणा
(3) बिनतारी दळणवळण यंत्रणा (4) नद्यांची यंत्रणा

www.upscfever.com

What has the geostationary satellite INSAT put in orbit by ISRO India improved ?

(1) Geological survey (2) Highway systems
(3) Wireless Communication systems (4) River systems

47. भारताच्या अणुऊर्जेच्या भविष्यातील योजने करता लागणारे एक अणुइंधन (nuclear fuel) भारताच्या समुद्र किनाराच्या मोनाझाईट वाळूत सापडते. ह्या अणुइंधनाचे नांव काय आहे ?

(1) युरेनियम (2) थोरीयम (3) प्लूटोनियम (4) रेडियम

India's future plans for nuclear energy are based on a particular nuclear fuel which is found in plenty in the monazite sands of India's seashore. What is the name of this nuclear fuel ?

(1) Uranium (2) Thorium (3) Plutonium (4) Radium

48. ऊर्जा निर्माण करता येत नाही अथवा नष्ट ही करता येत नाही परंतु एका प्रकारच्या ऊर्जेचे रूपांतर दुसऱ्या प्रकारच्या ऊर्जेत होते हा थर्मोडायनॅमिक्सचा कोणता नियम आहे ?

(1) तिसरा नियम (2) पहिला नियम (3) शून्यवा नियम (4) दुसरा नियम

'Energy can neither be created nor be destroyed. It may be converted from one form to another'. What law of thermodynamics is this ?

(1) Third law (2) First law (3) Zeroth law (4) Second law

49. सेंटीग्रेड व फॅरनहीट स्केल तापमान कोणत्या तापमानासाठी सारखेच असते ?

(1) – 40 (2) – 100 (3) – 32 (4) + 273

At what temperatures on centigrade scale is represented by the same temperature on Fahrenheit scale ?

(1) – 40 (2) – 100 (3) – 32 (4) + 273

---

50. जर धातूला उष्णता दिली तर त्याचे तापमानात काय होते ?

(1) सतत वाढते (2) सतत कमी होते

(3) स्थिर राहू शकते (4) वाढते किंवा स्थिर राहते

If heat is supplied to a metal what happens to its temperatures ?

(1) always increases (2) always decreases

(3) may remain constant (4) increases or remains constant

---

51. वनस्पती किंवा प्राणी यांचे आंरभीचे वय शोधण्यासाठी खालीलपैकी कोणता कार्बन आयसोटोप वापरतात ?

(1) C – 14 (2) C – 12 (3) C – 13 (4) यापैकी एकही नाही

Which of the following carbon isotopes is used to determine the age of plant or animal ?

(1) C – 14 (2) C – 12 (3) C – 13 (4) None of these

---

52. योग्य जोड्या लावा :

A) अल्बर्ट आईनस्टाईन 1) फोटोइलेक्ट्रीक इफेक्ट

B) इ. ओ. लॉवरिन्स 2) सायक्लोट्रॉन

www.upscfever.com

C) डी. ब्रॉगली 3) वेव्ह नेचर ऑफ इलेक्ट्रॉन

(1) A – 1 B – 3 C – 2

(2) A – 2 B – 1 C – 3

(3) A – 3 B – 1 C – 2

(4) A – 1 B – 2 C– 3

Match the following :

A) Albert Einstein 1) Photoelectric effect

B) E. O. Lawrence 2) Cyclotron

C) de Broglie 3) Wave nature of electrons

(1) A – 1 B – 3 C – 2

(2) A – 2 B – 1 C – 3

(3) A – 3 B – 1 C – 2

(4) A – 1 B – 2 C– 3

---

53. स्थिर हवेत तरंगाचे प्रसरण होत असताना पुढीलपैकी कोणती राशी कमी होते ?

(1) आयाम (2) दोलनकाल (3) वारंवारता (4) चाल

When a wave continues to propagate in still air, which of the following quantities decreases ?

(1) Amplitude (2) Period (3) Frequency (4) Speed

---

54. गवत-नाकतोडा-बेडूक-साप-गरुड या अन्नसाखळीस काय म्हणतात ?
(1) दलदलीची परिसंस्था (2) गवताळ परिसंस्था
(3) कृषी परिसंस्था (4) अरण्य परिसंस्था
What is Grass-Grasshopper-Frog-Snake-Eagle, foodchain called ?
(1) Marshy Ecosystem (2) Grassland Ecosystem
(3) Agro Ecosystem (4) Forest Ecosystem

---

55. लोखंडाचा सर्वात शुद्ध प्रकार ________ हा आहे.
(1) कास्ट आयर्न (2) रॉट आयर्न
(3) स्टील (4) स्टेनलेस स्टील
The purest form of iron is
(1) Cast iron (2) Wrought iron
(3) Steel (4) Stainless Steel

---

56. खालीलपैकी कोणते धातू नैसर्गिकरित्या स्वतंत्र व मूळ स्थितीमध्ये आढळतात ?
(1) Mg, Ca (2) Ni, Zn (3) Fe, Al (4) Pt, Au
Which of the following metals occur in free and native state ?
(1) Mg, Ca (2) Ni, Zn (3) Fe, Al (4) Pt, Au

---

57. जपानमध्ये आढळलेला मिनामाता रोग ________ मुळे झाला.
www.upscfever.com
(1) अर्सेनिक (As) विषबाधा (2) कॅडमियम (Cd) विषबाधा
(3) लिड (Pb) विषबाधा (4) पारा (Hg) विषबाधा
Minamata disease found in Japan was due to
(1) As poisoning (2) Cd poisoning
(3) Pb poisoning (4) Hg poisoning

---

58. पुढीलपैकी कोणते/कोणती विधान/ने सत्य आहे / त ?
1) गुरुत्वबल हे फक्त आकर्षण बल आहे.
2) केंद्रकीय बल हे आकर्षण बल व प्रतिकर्षण बल असू शकते.
3) स्थिरविद्युत बल हे आकर्षण व प्रतिकर्षण बल असू शकते.
4) गुरुत्त्व बल हे फक्त प्रतिकर्षण बल असते.
(1) फक्त 4 (2) 2 व 3 (3) 1 व 3 (4) 2 व 4
Which of the following statements is/are correct ?
1) Gravitational force is a force of attraction only.
2) Nuclear force can be attractive or repulsive.
3) Electrostatic force can be attractive or repulsive.
4) Gravitational force is a force of repulsion only
(1) Only 4 (2) 2 and 3 (3) 1 and 3 (4) 2 and 4

---

**59.** समुद्र सपाटीला हवेचा भार किती असतो ?

(1) 76 से.मी. (2) 29.9 इंच
(3) 1013.2 मिलीबार (4) वरीलपैकी सर्व

What is the atmospheric pressure at sea level ?

(1) 76 cm (2) 29.9 inch
(3) 1013.2 millibar (4) all the above

---

**60.** खालीलपैकी कोणत्या शास्त्रज्ञास भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले नाही ?

(1) निल बोर (2) आईनस्टाईन
(3) जगदीशचंद्र बोस (4) सी. व्ही. रामन्

Which of the following scientists was not awarded Noble prize in Physics ?

(1) Niel Bohr (2) Einstein
(3) Jagdishchandra Bose (4) C. V. Raman

---

**61.** अलिकडच्या काळात भारतीय निर्यातीमध्ये कोणत्या वस्तूंची वेगाने वाढ झाली आहे ?

(1) साखर व कापूस (2) सोने व चांदी
(3) चहा व कॉफी (4) इलेक्ट्रानिक वस्तू व सॉफ्टवेअर

In the recent past the export of which commodities have sharply risen ?

(1) Sugar and cotton (2) Gold and silver
(3) Tea and coffee (4) Electronic goods and software

www.upscfever.com

---

**62.** प्रा. हाशमी समितीच्या शिफारशीद्वारे सुवर्णजयंती ग्राम रोजगार योजनेत खालीलपैकी कोणत्या कार्यक्रमाचा समावेश केला नाही ?

(1) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम
(2) भारत निर्माण कार्यक्रम
(3) गंगा कल्याण योजना
(4) दशलक्ष विहिरी योजना

As per the recommendations of Prof. Hashmi Committee which of the following programmes was not included in Swarna Jayanti Gram Rojgar Yojana ?

(1) Integrated Rural Development Programme
(2) Bharat Nirman Programme
(3) Ganga's Welfare Plan
(4) Million Wells Plan

---

**63.** भारतात कर आकरणीकरिता कोणत्या कर पद्धतीचा अवलंब केला जातो ?

(1) प्रमाणशीर कर (Proportional taxes) (2) पुरोगामी कर (Progressive taxes)
(3) प्रतिगामी कर (Regressive taxes) (4) अधोगामी कर (Degressive taxes)

Which tax system is used for levying taxes in India ?

(1) Proportional taxes (2) Progressive taxes
(3) Regressive taxes (4) Degressive taxes

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

64. विशेष कर (special taxes) खालीलपैकी कशावर लावला जातो ?
(1) वस्तूंच्या आकारावर
(2) वस्तूंच्या वजनावर
(3) वस्तूंच्या गुण व दर्जावर
(4) वस्तूंच्या आकार व वजनावर
Special tax is levied on which one of the following ?
(1) On volume of commodity
(2) On weight of commodity
(3) On features and quality of commodity
(4) On volume and weight of commodity

65. सार्वजनिक उपक्रमांच्या अंकेक्षणाचा खालीलपैकी कोणता एक प्रकार नाही ?
(1) सरकारी विभागाचे अंकेक्षण
(2) सरकारी वैधानिक महामंडळाचे अंकेक्षण
(3) सहकारी संस्थाचे अंकेक्षण
(4) सरकारी प्रमंडळाचे अंकेक्षण
Which of the following is not a type of Audit of Public Enterprises ?
(1) Government Department Audit
(2) Government Statutory Corporations Audit
(3) Co-operative Societies Audit
(4) Government Companies Audit

66. भारत सरकारच्या शेतकी किंमत आयोगाचे (Agricultural Prices Commission) प्रमुख उद्दिष्ट्य कोणते आहे ?
(1) समतोल किंमत रचना
(2) समन्वित किंमत रचना www.upscfever.com
(3) वरील पर्याय क्रं. 1 व 2
(4) वरीलपैकी कोणतेही नाही
What is the basic objective of the Agricultural Prices Commission ?
(1) Balanced Price Structure
(2) Integrated Price Structure
(3) Options 1 and 2 above
(4) None of the above

67. आर्थिक सुधारणोत्तर काळामध्ये आयात-निर्यात धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये कोणती होती ?
(1) परकीय चलनाची बचत व स्वदेशी उत्पादन
(2) मुक्त आयात-निर्यात धोरण व आयात जकात रचनेचे सुसूत्रीकरण
(3) स्वयंपूर्णता व आयात पर्यायीकरण
(4) वरीलपैकी कोणतेही नाही
What were the main features of the Import-Export Policy during post-reform period ?
(1) Saving foreign exchange and domestic production
(2) Free Import-Export Policy and Rationalisation of Tariff structure thereof
(3) Self-reliance and import substitution
(4) None of the above

**68.** 1991 ते 2004 या काळात भारतीय आयात रचनेमध्ये कोणता बदल झाला ?

(1) पेट्रोल, वंगण व अशुद्ध तेलाची आयात मागणी घसरली

(2) खाद्यतेल, कडधान्ये, साखर इत्यादी वस्तूंची आयात वाढली

(3) लोखंड व पोलादाच्या आयातीत घट

(4) वरीलपैकी कोणताही नाही

What was the change in composition of India's import from 1991 to 2004 ?

(1) Fall in import demand of petrol, lubricant and oil

(2) Rise in import of edible oil, pulses, sugar etc.

(3) Fall in the import of iron and steel

(4) None of the above

---

**69.** खालीलपैकी कोणता बदल हा भारतीय विदेश व्यापाराच्या दिशेतील नाही ?

(1) भारतीय परकीय व्यापारातील इंग्लडचा कमी वाटा

(2) जपान आणि ऑस्ट्रेलिया ह्या देशांबरोबरील भारताच्या व्यापारात घट

(3) आशियाई व आफ्रिकी देशांशी भारताच्या परकीय व्यापारात वाढ

(4) लोखंड व पोलाद आयातीमधील घट

Which of the following is not the change in India's Direction of foreign trade ?

(1) Low share of England in Indian Foreign Trade www.upscfever.com

(2) Fall in India's trade with countries like Japan and Australia

(3) Rise in India's foreign trade with Asian and African countries

(4) Fall in import of iron and steel

---

**70.** खालीलपैकी कोणत्या धोरणाला 'सप्तरंगी क्रांती' असे संबोधले जाते ?

(1) लोकसंख्या धोरण (2) नव औद्योगिक धोरण

(3) नव कृषि धोरण (4) नव बँक धोरण

Which among the following is termed as 'Rainbow Revolution' ?

(1) Population Policy (2) New Industrial Policy

(3) New Agricultural Policy (4) New Banking Policy

---

**71.** अंकेक्षण व मूल्यांकनाची समस्या खालीलपैकी कोणत्या क्षेत्राशी निगडित आहे ?

(1) खाजगी क्षेत्रातील उद्योग (2) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग

(3) संयुक्त क्षेत्र (4) तृतीय क्षेत्र

Auditing and Evaluation problem is related to which sector among the following ?

(1) Industries in the Private Sector (2) Industries in the Public Sector

(3) Joint Sector (4) Tertiary Sector

---

72. सन् 2008-09 मधील उपभोक्ता किंमत निर्देशांकातील तीव्र वाढ कोणत्या कारणामुळे झाली होती ?
(1) पैशाच्या पुरवठ्यातील घट
(2) विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीतील जलद घट
(3) गहू, तांदूळ व डाळी यासारख्या अन्नधान्याच्या किंमतीतील तीव्र वाढ
(4) उत्पादनाच्या तंत्रामधील सुधारणा
What was the reason for the sharp increase in Consumer Price Index (CPI) in 2008-09 ?
(1) Decline in money supply
(2) Rapid fall in Foreign Direct Investment
(3) Sharp increase in the prices of foodgrains like wheat, rice and pulses
(4) Improvement in techniques of production

---

73. खालीलपैकी कोणते (2002-07) आयात-निर्यात धोरणाचे वैशिष्ट्य नाही ?
(1) कृषि निर्यातीवरील निर्बंध उठविणे
(2) लघुउद्योग व कुटीरउद्योग निर्यातीस प्रोत्साहन
(3) आयात पर्यायीकरण
(4) विशेष आर्थिक क्षेत्राचा विकास
Which among the following is not a feature of (2002-07) Import-Export Policy ?
(1) Removal of restriction on agricultural exports
(2) Promotion of exports by small scale and cottage industries
www.upscfever.com
(3) Import substitution
(4) Development of Special Economic Zone

---

74. खालीलपैकी कोणता स्त्रोत अंतर्गत सार्वजनिक कर्जाचा नाही ?
(1) देशातील बँका व इतर वित्तीय संस्थाकडून घेतलेले कर्ज
(2) विमा निधी
(3) भविष्य निर्वाह निधी
(4) आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून घेतलेले कर्ज
Which among the following is not the source of internal public debt ?
(1) Loans from Banks and other Financial Institutions
(2) Insurance Fund
(3) Provident Fund
(4) Loans from International Monetary Fund

---

75. 1991 ची नरसिंहम समिती कशाशी संबंधित होती ?
(1) दारिद्र्य (2) आयात निर्यात धोरण
(3) बँकेची वित्तीय व्यवस्था (4) बेरोजगार
What was the Narasimhan Committee 1991 related to ?
(1) Poverty (2) Import Export Policy
(3) Financial System of Bank (4) Unemployment

---

76. महागाई नियंत्रणात आणण्यासाठी खालीलपैकी कोणत्या साधनाचा वापर केला जातो ?
(1) मौद्रिक धोरणात बदल (2) आयात शुल्कात कपात
(3) सार्वजनिक वितरण व्यवस्था (4) वरील सर्व
Which of the following measures is used for controlling inflation ?
(1) Changing monetary policy (2) Reducing import duty
(3) Public distribution system (4) All above

77. प्रचंड तेजीचे वर्ष कोणते होते ?
(1) 1974-75 (2) 2001-02 (3) 2009-10 (4) 2010-11
Which was the year of hyper inflation ?
(1) 1974-75 (2) 2001-02 (3) 2009-10 (4) 2010-11

78. खाद्य निर्देशांक (Food Index) मोजण्यासाठी कोणत्या उत्पादनांना एकत्रित केले जाते ?
(1) प्राथमिक खाद्य वस्तु आणि उत्पादनसंस्थेतील उत्पादीत खाद्य पदार्थ
(2) प्राथमिक खाद्य वस्तु आणि कपडे
(3) उत्पादन संस्थेतील उत्पादीत खाद्यपदार्थ, गहू आणि तांदूळ
(4) साखर, गहू, तांदूळ आणि कपडे
Which products are considered to deduce the Food Index ?
(1) Primary food articles and manufactured food products
(2) Primary food articles and clothes
(3) Manufactured food products, wheat and rice
(4) Sugar, wheat, rice and clothes

www.upscfever.com

79. खालीलपैकी कोणते विदेशी व्यापार धोरण 2009-2014 चे उद्दिष्ट्य नाही ?
(1) निर्यातीचा खालावणारा कल पूर्वपदावर आणणे
(2) वार्षिक 15 टक्के निर्यात वृद्धी साध्य करणे
(3) भारताचा जागतिक व्यापारातील हिस्सा 2020 पर्यंत दुप्पट करणे
(4) चैनीच्या उपभोग्य वस्तूंची आयात वाढवणे
Which of the following is not an objective of Foreign Trade Policy 2009-2014 ?
(1) To reverse the declining trend of export trade
(2) To achieve an annual export growth of 15 percent
(3) To double India's share in global trade by 2020
(4) To increase imports of luxury consumer goods

80. आयात-निर्यात संस्थांच्या बाबतीत खालील वाक्ये दिली आहेत :
1) निर्यातदारांना राजकीय व वाणिज्यिक जोखीमीसाठी विमा-संरक्षण पुरवणे
2) निर्यातदारांना सागरी जोखीमीसाठी विमा संरक्षण पुरवणे
वरीलपैकी कोणते इ. सी. जी.सी. चे उद्दिष्ट्य आहे ?
(1) फक्त 1 (2) फक्त 2 (3) 1 व 2 (4) कोणतेही नाही
In the context of India's import, export agencies, consider the following :
1) Providing insurance cover to exporters against political and commercial risk
2) Providing insurance cover to exporters against marine risk.
Which of the above is/are objectives of ECGC ?
(1) Only 1 (2) Only 2 (3) Both 1 and 2 (4) None of the above

**81.** स्वातंत्र्यानंतर भारताच्या विदेशी व्यापार संदर्भात खालीलपैकी कोणत्या देशांच्या गटाला भारत सर्वाधिक निर्यात करतो ?

(1) ओ.इ.सी.डी. (2) ओपेक
(3) ईस्ट युरोप (4) विकसनशील देश

In the post independence period to which group of countries have India's exports risen ?

(1) OECD (2) OPEC
(3) Eastern Europe (4) Developing Nations

---

**82.** फेमा, 1999 चे उद्दिष्ट्य कोणते ?

(1) विदेशी पर्यटकांना प्रबंध (2) आयात नियंत्रण
(3) अनिवासी भारतीय गुंतवणुकीवर प्रबंध (4) बहिर्गत व्यापार व देय यांची सोय

What does FEMA, 1999 aim at ?

(1) Prohibiting Foreign Tourists (2) Controlling imports
(3) Prohibiting NRI investment (4) Facilitating external trade and payment

---

**83.** बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या उद्दिष्टांच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते वाक्य/कोणती वाक्ये बरोबर आहेत ?

1) अल्पांच्या मक्तेदारीचे निर्मूलन.
2) शेती, लघुउद्योग व निर्यातीसाठी पुरेसा कर्जाचा पुरवठा.
www.upscfever.com
3) खाजगी उद्योग गुंतवणुकीला नाउमेद करणे.

(1) 1 व 2 (2) 2 व 3 (3) 1 व 3 (4) फक्त 1

With reference to the objective of nationalisation of banks, which of the following statements is/are correct ?

1) Removal of control by few.
2) Provision of adequate credit to agriculture small industries and exports.
3) Discouraging private sector investment.

(1) 1 and 2 (2) 2 and 3 (3) 1 and 3 (4) Only 1

---

**84.** प्रादेशिक ग्रामीण बँकांची महत्त्वाची अडचण कोणती ?

(1) वसुलीचा प्रश्न (2) खेळत्या भांडवलाचा प्रश्न
(3) ग्राहकांची अशिक्षितता (4) अपुरा कर्मचारी वर्ग

What is the major problem of Regional Rural Banks ?

(1) Problem of Recovery (2) Problem of Working Capital
(3) Problem of illiteracy of customers (4) Problem of shortage of staff

85. रिझर्व्ह बँकेसंदर्भात खालील प्रवर्गाचा विचार करा.

1) कृषीक्षेत्र
2) लघुउद्योग
3) बांधकाम क्षेत्र
4) शैक्षणिक कर्ज

वरीलपैकी कोणते क्षेत्र प्राधान्य कर्जपुरवठ्यात येते ?

(1) फक्त 1 (2) 1 व 2 (3) 3 व 4 (4) 1, 2 व 4

In the context of RBI, consider the following :

1) Agriculture
2) Small Enterprizes
3) Construction
4) Education Loan

Which of the above areas is included in priority sector lending ?

(1) Only 1 (2) 1 and 2 (3) 3 and 4 (4) 1, 2 and 4

---

86. बँकांच्या शाखाविस्तारासाठी, जिल्हांचे विविध व्यवसायिक बँकांमध्ये भाग वाटप करण्याच्या उपक्रमास काय म्हणतात ?

(1) ग्रामीण विभागाच्या विकासाचा संकलित कार्यक्रम

www.upsclever.com

(2) अग्रणी बँक योजना
(3) बँकांचे राष्ट्रीयीकरण
(4) सेवा क्षेत्र दृष्टीकोन

What is the allotment of districts to various commercial banks for the purpose of rapid branch expansion called as ?

(1) Integrated Rural Development Programme
(2) Lead Bank Scheme
(3) Nationalisation of Commercial Banks
(4) Service Area Approach

---

87. भारतीय बँकांच्या किसान पत कार्ड योजनेचा हेतू काय आहे ?

(1) गरीब लोकांसाठी सूक्ष्म वित्त (2) शेतकऱ्यांसाठी अल्प मुदतीचे कर्ज
(3) शेतकऱ्यांसाठी पिकाचा विमा (4) शेतकऱ्यांसाठी दीर्घ मुदतीचे कर्ज

What is the purpose of Kisan Credit Scheme of Indian Banks ?

(1) Micro-credit to poor people (2) Short-term loan to farmers
(3) Crop insurance to farmers (4) Long term loan to farmers

**88.** खालीलपैकी कोणती सरकारी लेखापरीक्षणाची उद्दिष्ट्ये आहेत ?
1) तज्ञ अधिकाऱ्याने खर्चासाठी निधीची तरतूद केली आहे ते पाहणे.
2) खर्च हा मंजूर केला आहे ते पाहणे.
3) खर्चाचे देय योग्य व्यक्तीला केले आहे हे पाहणे ?
4) खर्चाचे वर्गीकरण केले आहे का ते पाहणे.

(1) 1 व 2 (2) 2 व 3 (3) 1, 2 व 3 (4) वरील सर्व

What is/are the objectives of government audit ?
1) There is a provision of funds for the expenditure duly authorised by the competent authority.
2) The expenditure is in accordance with a sanction properly accorded.
3) Payment has been made to a proper person ?
4) Charge is correctly classified.

(1) 1 and 2 (2) 2 and 3 (3) 1, 2 and 3 (4) All the above

---

**89.** अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या संदर्भात खालीलपैकी कोणते तंत्र समावेशक वृद्धीशी सुसंगत आहे ?
(1) आधारभूत सुविधांचा विकास
(2) शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक
(3) ऊर्जानिर्मिती क्षेत्रात मुबलक गुंतवणूक
(4) वरील सर्व

Which of the following in the context of $11^{th}$ five year plan is consistent with the strategy of inclusive growth ?
www.upscfever.com
(1) Infrastructure development
(2) A big scale increase in education and health allocations
(3) Huge investment in power generation
(4) All the above

---

**90.** भारतीय चलनफुगवट्याच्या संदर्भात खालील घटकांचा विचार करा.
1) वाढत्या प्रबंधित किंमती
2) तेलाच्या वाढत्या किंमती
3) वाढत्या लोकसंख्येचा भार
4) अप्रत्यक्ष करांमधील वाढ

चलनफुगवट्यास कारणीभूत असलेल्या वरीलपैकी कुठल्या घटकांना प्रशासन जबाबदार आहे ?

(1) 2 व 3 (2) 1, 2 आणि 3 (3) 1 आणि 4 (4) वरील सर्व

In the context of inflation in India, consider the following :
1) Rising administered prices
2) Rising oil prices
3) Pressure of growing population
4) Increase in indirect taxation.

In which of the above factors, Indian Government is responsible for inflationary tendencies ?

(1) 2 and 3 (2) 1, 2 and 3 (3) 1 and 4 (4) All the above

---

**91.** 6% पेक्षा कमी उतार असणाऱ्या जमीनीकरिता कोणत्या प्रकारचे बांध अधिक योग्य असतात ?

(1) ढाळीचे बांध (2) समतल बांध

(3) बंदिस्त बांध (4) जैविक बांध

What is the type of bunding recommended for lands with slope < 6% ?

(1) Graded bunding (2) Contour bunding

(3) Compartmental bunding (4) Live bunding

**92.** ज्वारीचा कोणता वाण लाह्यासाठी शिफारशीत आहे ?

(1) फुले रेवती (2) फुले उत्तरा (3) फुले पंचमी (4) फुले वसुधा

Which variety of sorghum is specially recommended for popping purpose ?

